द्वारकाबाई पांडुरंग भालेराव व इतर
विरुध्द
भिमाबाई भगवान भालेराव व इतर

## निशाणी क्र. २३ व २५ वरील आदेश

१. सदरचे अर्ज प्रतिवादी क्र.४ यांनी दि.२०/०३/२०२४ रोजी त्यांच्या विरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन मिळणेकामी तसेच कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. वादी व प्रतिवादींच्या वकीलांचे म्हणणे ऐकले.

३. प्रतिवादींच्या वकीलांनी असे कथन केले की, प्रस्तुत प्रतिवादींना दाव्याचे समन्स मिळाले. परंतु त्यांना नेमलेल्या तारखेस वकीलांमार्फत हजर राहणे शक्य झाले नाही. तसेच प्रतिदी क्र. ४ ला दावा मिळकतीसंबंधाने जुनी कागदपत्रे काढण्यास बराच वेळ लागल्याने मुदतीत कैफियत दाखल करणे शक्य झाले नाही. प्रतिवादीला कैफियत दाखल करण्यासाठी सुमारे २० महिन्यांचा उशिर झाला आहे. सदर दाव्याचा निकाल गुणदोषावर न्यायनिर्णय होण्यास प्रतिवादींची कैफियत अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. कैफियत दाखल करणेकामी झालेला विलंब नैसर्गिक न्यायतत्वानुसार माफ केल्यास वादीवर कोणताही अन्याय होणार नाही. सबब दोन्ही अर्ज मंजुर करण्यात यावे अशी विनंती केली.

४. वादीच्या वकीलांनी त्यांचा जबाब दाखल केला व असे कथन केले की, विलंबाची कारणे न पटणारी असुन, कायदेशीर व संयुक्तिक नाही. कागदपत्रे काढण्यास एवढा विलंब लागत नाही. प्रतिवादी सातत्याने गैरहजर आहे. सबब दोन्ही अर्ज नामंजुर करण्यात यावे अथवा मंजुर करावयाचा झाल्यास जास्तीत जास्त खर्चासह मंजुर करण्यात यावे ही विनंती केली.

५. अर्ज व त्यावरील म्हणण्याचे अवलोकन केले.

६. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या १९०८ मधील आदेश ८ नियम १ नुसार दाव्याचे समन्स मिळाल्यापासुन जास्तीत जास्त ९० दिवसाच्या आत कैफियत व मनाई अर्जास लेखी जबाब दाखल करणे आवश्यक आहे. दाव्याच्या समन्सची बजावणी होऊन प्रतिवादी दाव्यात हजर झालेले नाही व त्यांनी मुदतीत कैफियत दाखल केली नाही. कैफियत दाखल करण्याकरीता प्रतिवादींना २० महिन्यांचा विलंब झालेला आहे.

७. कोणताही दावा गुणदोषावर निकाली काढणे आवश्यक आहे. त्यासाठी दोन्ही पक्षांना पुरेशी संधी मिळणे गरजेचे आहे. प्रस्तुतचा दावा वादीने निरंतर मनाईकरीता दाखल केलेला आहे. सदरच्या दाव्याचा विचार करीता प्रतिवादींविरुध्द झालेला एकतर्फा आदेश रद्द करुन कैफियत अभिलेखावर आली असता प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होईल. त्यामुळे वरील सर्व परीस्थिती विचारात घेऊन नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने व प्रस्तुतचा दावा गुणदोषावर निकाली काढण्यासाठी सदरचे अर्ज खर्चासह मंजुर करण्यास पात्र आहे. सबब खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**आदेश**

१) निशाणी क्र.२३ व २५ वरील अर्ज वादीला रक्कम रु.१०००/- खर्च देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतात.

२) प्रतिवादी क्र.४ विरुध्द दि.२०/०३/२०२४ रोजी झालेला एकतर्फा आदेश रद्द करण्यात येतो.

३) प्रतिवादी क्र.४ यांना कैफियत दाखल करण्याकरीता झालेला विलंब माफ करण्यात येतो.

४) प्रतिवादी यांनी उपरोक्त खर्चाची रक्कम वादीला दिल्यानंतर त्यांची कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

**सही/-**
**(स्नेहा सुनिल पुळूजकर)**
**२रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, घोडेगाव**
**ता. आंबेगाव, जि. पुणे.**

**दि.२४/०६/२०२६**
**घोडेगाव**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Court | : | Smt. Sneha Sunil Pulujkar,<br>2nd Jt. Civil Judge Junior Division, Ghodegaon, Dist. Pune |
| Name of the Steno | : | J. S. Kaite, Steno Grade - III. |
| Order date | : | 24/06/2026 |
| Order signed by P.O. on | : | 24/06/2026 |
| Order uploaded on | : | 24/06/2026 |